# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

CB 61/2026

## प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक ०१/१०/२०२६

**“ हेवन थाई स्पा, शॉप नंबर २/५, पुजा कॉम्पलेक्स, प्लॉट नंबर १५ बी, सेक्टर १७, न्यु पनवेल येथे मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायातुन पाच पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका ”**

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गजानन कदम यांना दिनांक २९/०९/२०२६ रोजी माहिती मिळाली की, हेवन थाई स्पा, मध्ये महिला मॅनेजर ही स्पा मध्ये असलेल्या महिलाकडुन वेश्या व्यवसाय करून घेत आहेत.

वपोनि/गजानन कदम यांनी बातमीप्रमाणे बनावट ग्राहकाच्या मदतीने हेवन थाई स्पा येथे छापा टाकला असता, त्याठिकाणी ०३ मिझोराम व ०२ मणिपुर राज्यातील महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. मॅनेजर रोझी हिने पिडीत यांना बनावट ग्राहकांस दाखवून वेश्याव्यवसायाचा मोबदला महिला आरोपी ॲमेनी स्वीकारला व नमुद शॉप हा वेश्याव्यवसायाकरीता वापरला. तसेच आरोपी यांनी आपआपसात संगणमत करून पाच पिडीत यांना स्पा मध्ये मसाज करण्याच्या उददेशाने प्राप्त करून त्यांना वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. म्हणुन महिला मॅनेजर महिला आरोपी १) रोझी उर्फ Vanlalianchhungii C lalrei Chinzah age -32, महिला आरोपी २) B Lalnuntluangi Lalirnawma Emily age -18 year दोन्ही मुळ राहणार Mizoram, पुरूष आरोपी ३) सुहेल याकुब निजामी, वय ४८ वर्ष, राहणार नेरूळ, नवी मुंबई तसेच पाहिजे आरोपी ४) राजेन्द्र विठठलराव कोलकर, वय ५० वर्ष, राहणार न्यु पनवेल, रायगड यांच्या विरूध्द खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ३२१/२०२६ बीएनएस कलम १४३ (३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये दिनांक ३०/०९/२०२६ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन्ही महिला आरोपी व पुरूष आरोपी यांना दिनांक ३०/०९/२०२६ रोजी ०७.३२ वाजता अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक ०२/१०/२०२६ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला असुन तपास खांदेश्वर पोलीस ठाणे करत आहे

सदरची कारवाई सहा.पोलीस आयुक्त,शैलेशकुमार अंचलवार, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/ गजानन कदम, पोलीस उप निरीक्षक/सरिता गुडे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३४५२ कोलते, पोशि/३२२५ आव्हाड, पोहवा/२५०४ ज्योती अडकमोल, यांनी केला आहे.

★★★★★★★★★★★

